(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- CCLXXVII (277) -D

## Impact of COVID-19 on Indin Economy



**Chief Editor**

Prof. Virag S. Gawande
Director
A. S.R.& D. T. Institute Amravati

**Executive Editor**

Dr. A. N. Gharde
Principal
Arts, Commerce & Science College,Maregaon

**Editor**

Dr.Santosh Gaikwad
Dept. Of Commerce
Arts, Commerce & Science College,Maregaon

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## March -2021

ISSUE No- (CCLXXVII) 277 ( D)

## "Impact of COVID-19 on Indian Economy" (ICIE-2021)

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. A. N. Gharde**
Executive Editors
Principal
Arts, Commerce & Science College, Maregaon

**Dr.Santosh Gaikwad**
**Dept. Of Commerce**
Editor
*Department of Commerce*
**Art's, Commerce & Science College, Maregaon Dist. Yavatmal (Maharashtra)**

**Aadhar International Publication**
For Details Visit To : **www.aadharsocial.com**
© **All rights reserved with the authors & publisher**

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | कोवीड–१९ आणि भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने **डॉ. प्रदीप दामोदरराव दरवरे** | 1 |
| 2 | कोव्हीड १९ आणि भारतीय स्थलांतरित मजुरांच्या समस्या **प्रा. डॉ. धीरजकुमार नजान** | 5 |
| 3 | अकोला जिल्ह्यातिल ग्राहकांची किंमत समज आणि मूलभूत व चैनीच्या वस्तूंवरील किंमतीवर कोरोना महामारीचा प्रभाव. **श्री चंद्रकांत बी .धुमाळे** | 10 |
| 4 | कोरोनाचा जागतिकीकरणावर परिणाम **डॉ. अनंता सूर** | 14 |
| 5 | कोरोणाचा (कोवीड – १९) भारतीय शिक्षण व्यवस्थेवर होणारा परिणाम **प्रा. डॉ. प्रविण प्र. कुलकर्णी** | 18 |
| 6 | कोरानानंतरची जागतिक अस्वस्थता आणि आव्हाने **डॉ. सिद्राम किशनराव मुंडे** | 23 |
| 7 | भारतीय अर्थव्यवस्थेवर कोव्हीड–१९ चा पडलेला प्रभाव **कविता प्र. हिरुळकर** | 28 |
| 8 | समग्र शिक्षा अभियान योजनेची पार्श्‍वभूमी व महाराष्ट्र राज्यात अनुदानाचे वाटप **डॉ. साहेबराव राऊसाहेब चव्हाण** | 33 |
| 9 | कोव्हिड –१९ चा भारतीय उद्योगावर झालेला परिणाम **प्रा. डॉ. अमोल स. राऊत** | 39 |
| 10 | भारतीय संगीत क्षेत्रावर कोविड–१९ चा प्रभाव आणि उपाययोजना **डॉ. सुनील बाबुलालजी पटके** | 41 |
| 11 | कोविड १९ मुळे महाराष्ट्रातील कृषीक्षेत्रावर होणारा परिणाम **डॉ. दशरथ वसंत काळे. / डॉ. प्रफुल्लकुमार ना. तायडे** | 46 |
| 12 | कोरोना महामारीमुळे बदललेली सामाजिक मानसिकता **प्रा डॉ विश्वनाथ रासवे** | 50 |
| 13 | कोरोना पर्यटन : लॉकडाऊन आणि प्रवासबंधीमुळे पर्यटन व्यवसायाला बसलेला फटका **प्रा. डॉ. संकेत सुरेश काळे** | 54 |
| 14 | कोविड–१९ चा भारतीय कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम **अंकुश तुळशिदास तुरखडे** | 58 |
| 15 | कोविड -19 चा भारतीय समाज आणि अर्थव्यवस्थेवर झालेला प्रभाव **प्रा.डॉ. राजू लोटन भदाणे** | 62 |
| 16 | आहाराचा (कोवीड १९) आजारावर परिणाम **प्रा. डॉ. विभा छ. घोडखांदे** | 64 |
| 17 | कोविड -१९(कोरोना) चे समाज जिवनावरील परिणाम **प्रा.डॉ.सुरेश एम.डोहणे** | 68 |
| 18 | शेती क्षेत्रावर कोरोना –१९ च्या टाळेबंदीचा परिणाम **प्रा.डॉ.प्रकाश मारोतराव वांढरे** | 72 |
| 19 | कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची बिकट वाट **पुरुषोत्तम रंगराव चाटे** | 76 |
| 20 | कोवीड १९ चा शेती क्षेत्र व रोजगारावर झालेला परिणाम. **डॉ. पी.आर.बोबडे** | 80 |
| 21 | ज्योती – तुकडोजी: अर्थान्वयी चिंतक **प्रा. डॉ. राजेश चवरे** | 83 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

# कोरोनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची बिकट वाट

पुरुषोत्तम रंगराव चाटे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी महविद्यालय मोताळा,जि.बुलडाणा

**प्रस्तावना :-**

भारत देशाचा विचार केला तर इंटरनेट सारखे अनेक खेड्याचे जाळे मिळून तयार झालेला देश अशी व्याख्या जर केली तरी सुद्धा अतिशोक्ती ठरणार नाही.विविध धर्म,पंथ जाती,पाती व बोली-भाषा,संस्कृती आणि सणउत्सव आशा विविधतेत एकता असणाऱ्या देशात कोविड -१९ ची परिस्थिती हाताळणे खुप कठीण आहे. मानवी समाजाच्या आजवरच्या वाटचालीत अनेक स्थित्यंतरे झाली आहेत या स्थित्यंतरातून धडा घेत मानवी समाजाने आपला विकास साध्य करत आहे. आज कोविड-१९ च्या विषाणूने मानवी समाजाला पुन्हा अश्याच एका अनपेक्षित स्थित्यंतरात टाकले आहे.या अनपेक्षित आजाराने जगभरात जी परिस्थिती निर्माण करून ठेवली त्यामुळे सर्व जन आपापल्या क्षेत्रात या परिस्थितीचे गांभीर्याने विश्लेषण करत आहे.मध्ययुगीन कालखंडातुन आधुनिक कालखंडात प्रवेश करतांना जगभरात रेनेसान्स (प्रबोधन) ची चळवळ सुरु झाली होती.त्यातून मानवी समाजाने नव्या मूल्यांचा स्वीकार करत सर्वच सामाजिक संस्थांमध्ये झालेला बदल अंगिकारला होता. त्याचप्रमाणे आज कोरोना आपत्तीच्या काळात आपल्या सुद्धा सर्वच क्षेत्रांमध्ये होऊ घातलेले किंबहुना लादले गेलेले बदल आज आपल्याला दिसत लागले आहेत.या बदलांना सर्वात मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागणार आहे. आपल्या देशातील शोषित कष्टकरी कामगार वर्ग, ग्रामीण शेतमजूर, शेतकरी, यांना आणि त्याच बरोबर बहुजन, दलित आदिवासी किंवा अल्पसंख्यांक या समाज घटकांना या साथरोगाची खूप मोठी झळ सोसावी लागत आहे. प्रत्येक देशावर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या आर्थिक,सामाजिक,राजकीय,शैक्षणिक,आरोग्यविषयक संकटामुळे त्या देशातील जनजीवनावर व विकासदरावर प्रतिकूल परिणाम झाल्या शिवाय राहत नाही. २०१७ पासून भारतीय अर्थव्यवस्थेची खालावत जाणारी स्थिती,सरकारचा धोरण लकवा,इंधनाच्या वाढत्या किमंती,बेरोजगारीची स्थिती,कृषी क्षेत्राबद्दल उदासीनता आणि त्याला भरीस भर म्हणून २०२०-२१ चे कोविड-१९ चे अरिष्ट यामुळे आर्थिक घसरणीची तीव्रता व व्याप्ती वाढत गेली.

**कोरोना महामारीची व्याप्ती :-**

कोरोना महामारी हे जागतिक स्वरूपाचे संकट आहे. जगभरातील १९६ देशांपैकी १७५ देशात कोरोना विषाणूच्या साथीने थैमान घातले आहे.भारतातील पहिली कोरोना बाधित व्यक्ती केरळ या राज्यात ३० जानेवारी २०२० रोजी सापडली.०२ एप्रिल २०२० पर्यंत केंद्रीय कुटुंब कल्याण व आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार देशामध्ये एकूण २००० व्यक्ती कोरोना बाधित आढळल्या.देशातील महाराष्ट्र,दिल्ली,कर्नाटक,केरळ,गुजरात ,तामिळनाडू,पंजाब व हरियाणा या राज्यात कोरोना बाधित व्यक्तीची संख्या जास्त होती. आतापर्यंत म्हणजे २२ फेब्रुवारी २०२१ पर्यंत भारतात एकूण कोविड पेशंट १ कोटी १० लाख ०९ हजार ७८४ आहे. तर कोरोना संसर्गाने भारतात १,५६,४७० इतके मृत्यू झाला आहे. फेब्रुवारी २०२१ मधील कोरोना बाधित व्यक्तीची वाढती संख्या पाहून भारतात पुन्हा टाळेबंदी स्विकारवी लागते कि काय अशी अवस्था निर्माण झाली आहे. तसेच टाळेबंदीच्या मार्गाचा अर्थव्यस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसत आहेत.कोरोनाच्या साथीपुढे जगातील बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या आहेत. अगदी सूक्ष्म स्वरूपातील या विषाणूने परिस्थिती चिंताजनक केली आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी समूहाला 'जिवंत राहणे' हीच आपली प्राथमिकता आहे हे अधोरेखित करायला भाग पाडले आहे. साथीच्या प्रकारातील या विषाणूचा प्रादूर्भाव जगभरातील अनेक श्रीमंतापासून ते गरीबापर्यंत होतोय.



B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

**भारतीय अर्थव्यवस्थेची वस्तुस्थिती:-**

भारतातील वस्तुस्थिती आशी आहे की इथला शेतकरी दरवर्षी महामंदीच्या वाटेवरच शेती करतो. किंवा

**भारतीय अर्थव्यवस्थेची वस्तुस्थिती:-**

भारतातील वस्तुस्थिती अशी आहे की इथला शेतकरी दरवर्षी महामंदीच्या वाटेवरच शेती करतो. किंबा भारतीय शेती मान्सूनचा जुगार आहे असे उपहासाने म्हंटले जाते.गतवर्षी पाऊस कमी पडला त्यामुळे खरीप पीक उगवलचं नाही. यावर्षी चांगला पाऊस पडला हा आनंद मिळायच्या आत अवकाळी पावसाने सर्व नासधूस करून टाकली. जो काही माल उरला तो लॉकडाऊनमुळे अडकून पडला. फळे, भाजीपाला,दुध,मास व अंडे हा नाशवंत माल आहे, हा सर्व माल मिळेल त्या भावात देऊन टाकायला कोरोनाने भाग पाडले. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही पुन्हा कर्जाचा हप्ता थकीत करून चक्रवाढ व्याज वाढत राहणार!' ही शेतकऱ्यासाठी महामंदीचं आहे. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेची असणारी स्थिती आणि कोरोनाच संकट अत्यंत बिकट परिस्थितीला जन्म घालेल. लोकांना काही दिवसानंतर जर रोजगार भेटला नाही तर कोरोनापेक्षा उपासमारीने जीव गेल्याच्या घटना समोर येतील.टाळेबंदीवर जास्त अवलंबून राहून सरकारने सर्व आर्थिक उपक्रम व उद्योग व्यवहार बंद केले त्याचा परिणाम म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने असे भाकीत केले होते की,या कोरोना साथरोगाचा परिणामामुळे भारतीय व्यापार ३४८ दशलक्ष अमेरिकन डॉलर ने घटेल.भारत हा जगातील प्रतिकूल परिणाम झालेला १५ वा देश असेल.Indian Rating & Research च्या मते आपल्या देशाचा GDP वृद्धीदर -५.४% असेल आणि हा वृद्धीदर गेल्या ४० वर्षातील सर्वात कमी असेल.या सर्व भाकीतावरून असा निष्कर्ष काढता येतो की भारतीय अर्थव्यास्थेची भविष्यातील वाटचाल आर्थिक घसरणीकडून आर्थिक मंदीकडे होतांना दिसेल.

**भारतातील रोजगार स्थिती :-**

कोरोना साथीच्या आजाराचा आणि लॉकडाऊनचा दुहेरी फटका भारतीय अर्थव्यवस्थेला येणाऱ्या काळात बसणार आहे.या महामारीच्या काळात आपला GDP ४% घटणार व पैश्याच्या स्वरुपात त्याचे ९ लाख कोटीचे नुकसान असेल.या नुकसानीची भरपाई करण्यसाठी आपणास २०२२ पासून भारताला ८.५% वृद्धीदराने आर्थिक विकास करावा लागेल.आर्थिक वृद्धी व रोजगार यांचा प्रत्येक्ष सहसंबध आहे.C.I.M.E. च्या मते ८ मार्च २०२० रोजी बेरोजगारी चा दर ७.७% होता.तो एप्रिल च्या पहिल्या आठवड्यात २४% वाढल्याचे दिसून आले. ओक्स्फम च्या २०१९ च्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे की भारताच्या १% लोकांकडे ७३% संपत्ती केंद्रित आहे.म्हणून भारताला श्रीमंताचा गरीब देश म्हंटले जाते.लोकांचे जीवन पूर्ववत होण्यासाठी खूप मोठ्या काळाची गरज लागेल. लघु व कुटीर उद्योग, शेतकरी, मजूर वर्ग, लघुव्यावसायिक यांच्यासाठी येणारा काळ कठीण राहील. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बेरोजगारीमुळे जास्त प्रभावित होईल. कोरोना विषाणूविरोधात लढणे संपूर्ण मानवजातीसाठीच आव्हानात्मक ठरेल. लॉकडाऊनच्या काळात सुरवातीला जास्तीत जास्त संशयित रुग्णाच्या तपासण्या होणे गरजेचे होते . परंतु अपुऱ्या आरोग्य सुविधा मुळे ते शक्य झाले नाही. भारत देशाचा विचार करता बेरोजगारीच्या काळात ग्रामीण व शहरी भागातील लोकांपर्यंत रेशन आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सातत्याने केला गेला पाहिजे. सरकारने देशातील सर्व जनतेला विश्वासात घेऊन काम केले तर नक्कीच आपण कोरोन विषाणूचा प्रसार होण्याला प्रतिबंध करू शकतो.

**शेती क्षेत्राची स्थिती :-**

गेल्या वर्षी २५ मार्च २०२०पासून देशात लागू झालेल्या टाळेबंदीचा ग्रामीण भारतातील अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाला आहे. अनेकांच्या रोजगारावर त्यामुळे गदा आली आहे. ग्रामीण व शहरी भागात ज्यांचे पोट हातावर आहे, अशा लोकांच्या हालअपेष्टांना सीमा उरलेला नाही. देशात सर्वाधिक रोजगार शेतीक्षेत्राशी निगडीत आहेत. म्हणजे देशात जेवढी श्रमशक्ती अस्तित्वात आहे त्याच्या निम्मी श्रमशक्ती एकट्या शेती व शेतीशी निगडीत क्षेत्रात कार्यरत आहे. हातातोंडाशी आलेले रब्बी पीकाचे गेल्या वर्षी मोठे नुकसान झाले . शेतातील पीक काढणीला आले परंतु त्यासाठी वेळेवर मजूर मिळेनासे झाले होते . टाळेबंदीमुळे सर्व व्यवहारच ठप्प झाले होते.पीक काढणीत उपयोगाला येणारी हार्वेस्टर्स, थ्रेशर्स,ट्रॅक्टर्स यांसारखी यंत्रे मिळेनाशी झाली होती,मालवाहतूक ठप्प झाली होती,लोकांच्या हालचालींवरच बंदी आली होती.फळे, भाजीपाला आणि फुले

यांसारख्या नाशवंत पिकांचे उत्पादन तर तोट्यात गेले.त्यांच्या मालाला उठाव नाही. हाती असलेला माल त्यांना कवडीमोल भावाने विकावा लागत होता.त्याचबरोबर खरीप हंगाम वेळेवर सुरु झाला परंतु कृषी बि बियाणे,रासायनिक खाते यांचा तुटवडा अश्या दुहेरी संकटात कृषी क्षेत्र भरडले गेले. नगदी पिके असो का अन्नधान्य पिके सर्वच्या किमती कमी झाल्याने शेतकरी वर्गाला आसमानी व सुलतानी संकटाचा सामना एकाच वेळी करवा लागला.ऐकूण शेतमजुरापैकी ५५% भूमिहीन तर ४५% अल्पभूधारक आहे.२०१८-१९ या वर्षात कृषिमाल निर्यातीपासून सरकारला ३८ अब्ज रुपये मिळाले होते.ते या महामारीच्या काळात सोडून द्यावे लागले. अनेकांच्या रोजगारावर त्यामुळे गदा आली आहे.

**कृषी पूरक उद्योग :-**

सागरी वाहतूक बंद, व्यापारावर निर्बंध, हालचालींवर निर्बंध यांमुळे मच्छिमार वैतागले आहेत. युरोप आणि अमेरिकेत निर्यात होणारा शिंपल्यांचा व्यापार ठप्प झाला आहे तसेच स्थानिक बाजारपेठेत माशांना मागणी कमी होऊ लागली आहे, त्यामुळे मच्छिमारांना न भूतो, न भविष्यति अशा परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. **लहान दुग्धउत्पादक शेतकरी यांनाही मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागत आहे.कारण अनेक खासगी कंत्राटी संस्थांनी त्यांचा माल घेण्यासच नकार दिला होता . मच्छिमारांची अवस्थाही काहिशी अशीच आहे. मार्चअखेरपासून मच्छिमारांनी मासेमारीसाठी समुद्रात बोट ढकललेलीच नाही. आणि आता माशांचा प्रजननाचा काळ म्हणून दरवर्षी जाहीर होणारा ४५ दिवसांचा ना-मासेमारी हंगामही तोंडावर येऊन ठेपला. त्यामुळे मच्छिमारांसमोर रोजगाराचा प्रश्न आ वासून उभा आहे.कुकुटपालन व्यवसाय या वर्षी प्रचंड डबघाईस आला.बर्डफ्ल्यूमुळे कुकुटपालन व्यवसाय दुहेरी संकटात सापडला आहे.**भारतामध्ये ६ लाख पेक्षा जास्त खेडी आहेत.आज सुद्धा बहुसंख्य जनता ग्रामीण भागात वास्तव्याला असते.त्यावेळी या कोरोनामय परिस्थितीत ग्रामीण अर्थव्यवस्थेला दुर्लक्षून चालणार नाही.त्यांना आवश्यक ती मदत केंद्र व राज्य सरकार दोघांनी करणे गरजेचे आहे.

**आरोग्य क्षेत्राची स्थिती :-**

कोरोना विषाणूवर जानेवारी महिन्यात लस पूर्णपणे तयार होवून लसीकरण सुरु झाले.लोकांनी लस आल्यामुळे या विषाणूची भीती बाळगणे व खबरदारीचे उपाय करणे जवळ-जवळ बंद केले.त्याचा परिणाम फेब्रुवारी महिन्यात कोरोन विषाणू पुन्हा डोके वर काढतांना दिसत आहे.आपल्या देशात आरोग्य व्यवस्थेवर एकूण GDP १.५% इतका खर्च देखील होत नाही.तसेच दर १० लाख लोकसंख्येमागे डॉक्टरांची उपलब्धता ८०२ इतकी आहे हे प्रमाण नेपाळ,पाकिस्तान व मलेशिया यांच्यापेक्ष्या कमी आहे.सुरुवातीला कोरोना उपचारासाठी केवळ सरकारी हॉस्पिटल मध्ये जावे लागत असे.त्याची संख्या अपुरी,स्टाफ अपुरा व आवश्यक सोयी देखील उपलब्द नाहीत.या आजारातून मुक्त होण्यासाठी पेशंट ला १४ दिवस विलगीकरण कक्षात ठेवण्यासाठी पुरेसी व्यवस्था आपल्याकडे नाही.कित्येक पेशंट ला उपचाराआभावी आपले प्राण गमवावे लागले.आरोग्य सेवा ही सामाजिक सेवा असून ती आपल्याकडे दुर्लक्षित आहे याची खंत वाटते.जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक लागतो.त्यामुळे लसीकरण करतांना आपल्याला जास्त खबरदारी घ्यावी लागेल.

**आर्थिक विषमता :-**

कोणत्याही देशापुढे प्रामुख्याने दोन प्राथमिकता असतात पहिली देशाची आर्थिक सुबत्ता आणि दुसरी देशातील जनतेच्या मानवी सुविधांची उपलब्धता. आज आपल्या पुढे या दोन्ही प्राथमिकतांवर मोठ्या समस्या उभ्या राहिल्या आहेत खर तर कोरोनाच्या काळात जी आर्थिक घसरण झाली आहे आणि मानवी सुविधांच्या बाबतीत या देशातील यंत्रणा ज्या पद्धतीने उघड्या पडल्यात त्यातून या देशात शहरी आणि ग्रामीण भारतात असलेली विषमता किती भीषण आहे याचे चित्रही सर्वांनीच बघितले. या निर्माण झालेल्या परिस्थितीला कोरोनाकाळ जबाबदार आहे असे सांगितले जाते आहे परंतु हे अर्धवट सत्य आहे.कोरोनाच्या पुर्वी जी धोरणे व योजना आपल्या देशात सर्व क्षेत्रांमध्ये राबविल्या जात होत्या त्यातून भांडवली भरभराट दिसत होती.परंतु इंडिया आणि भारत यातील विषमतेला खतपाणी घालण्याचे बळ त्यातूनच मिळत होते आणि जीडीपी हा एकच विकासाचा निकष मानून उद्योग आणि व्यापार या वरच लक्ष केंद्रित करत त्याच्या विकासासाठी शेती आणि इतर सेवाक्षेत्रांचे उलट शोषण सुरु

होते. ज्यातून समाजाच्या सर्वच क्षेत्रात असणारा समतोल ढासळत होता आणि इंडियाविरुद्ध भारत असा संघर्ष दिसत होता. कोरोनाच्या काळात तो अधिक तीव्र होऊन समोर आलाय महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या समस्यांनी आत्महत्येची भीषणता कोरोना येण्यापुर्वीच गाठली होती.स्थानिक पातळीवर रोजगार नाही म्हणून ग्रामीण भागातून मजूर कष्टकरी वर्ग शहरांकडे धाव घेवून तेथे झोपडपट्टीत जगण्याचा संघर्ष करत होता कोरोनामुळे झालेल्या लॉकडाऊन मुळे तो संघर्ष किती जीवघेणा होता हे देशाने रस्त्यांवर बघितले.या देशातील जागतिकीकरणावर आधारित अर्थव्यवस्थेने जन्माला घातलेला नवा उच्च मध्यम वर्गही या काळात संकटात आला आहे आणि बेरोजगारीची समस्या नव्या रूपाने अधिक तिव्र झाली .जागतिक बँकेच्या बहुआयामी निर्देशंकानुसार भारतातील ५५% म्हणजे एकूण लोकसंखेच्या ६५% लोकसंख्या गरीब अथवा दारिद्र्य रेषेखाली आहे.भारताचा गिनी गुणांक मार्च २०२० प्रमाणे ०.५० आहे.त्यामुळे भारतात प्रचंड आर्थिकविषमता असल्याचे दिसून येते.

**सारांश :-**

आज या परिस्थितीत अर्थव्यवस्था पूर्ववत सुरु करणे एव्हडेच पुरेसे होणार नाही तर कोरोना पूर्वीची धोरणेही बदलवावी लागतील खरे तर भूतकाळात झालेल्या चुका सुधारण्याची ही संधी निर्माण झाली आहे असेही म्हणता येईल म्हणून यापुढे विकासाची धोरणे व उपाययोजना या केवळ उद्योग व व्यापारकेंद्रित न रहाता ग्रामीण भागातील शेती व्यवसाय व त्यातील सेवा आणि पूरक जोडधंदे यावर भर देणारी असावी. जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे आणि दबावामुळे केवळ गुंतवणूक आणि नफा याचे गणित मांडत उभारलेल्या बाजारपेठा या केवळ मागणी आणि पुरवठा यावरच चालत नाहीत तर मानवी समाजातील सर्व घटकांचा समतोल साधत या घटकांच्या मानवी विकासासाठीही गुंतवणूक करावी लागते.अन्यथा ही सारी विकासाची सूज बूमरँगसारखी उलटते. त्यामुळे देशाचां विकासदर, जीडीपी याची कसरत करत देश विकासाच्या रस्त्यावर अग्रेसर आहे हे जनतेपुढे मांडत किंवा तसा किमान आभास निर्माण करत सत्तेत टिकून राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या राजकीय पक्षांपुढे ही मोठा पेच निर्माण होईल.कारण विकासच्या गोंडस नावाखाली शाश्वत विकासाची पायमल्ली होतांना दिसते.त्यामुळे नैसर्गिक,मानवनिर्मित अथवा जैविक घटनांना भाविष्यात सामोरे जावे लागणार आहे.म्हणून या संकटाचा सामना करण्यासाठी काळाची पावले ओळखून तयार असणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची :-**

world Bank Occasional Reports -2020
world Helth organsation Occasional Reports -2020
भारतीय अर्थव्यवस्था -२०१६ दत्त-सुंदरम
भारतीय अर्थव्यवस्था -२०१७ देसाई भालेराव
भारतीय अर्थव्यास्थे-२०१८ रमेश सिंह
शेती शेतकरी आणि अर्थकारण -२०१५ रमेश पाध्ये
अर्थसंवाद –२०२० जुलै-सप्टेंबर त्रैमासिक
लोकसत्ता वर्षवेध -२०२०
इंटरनेट संकेतस्थळ